## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
## (अर्थसंकल्पीय विशेष सभा)

शनिवार, दि. १९.३.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा.सौ.शैलजा किशोर स्वामी,महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| कुरेशी शफी अहेमद | कदम गंगाराबाई नारायण |
| सातेलीकर श्रीनिवास आशन्ना | पवळे उमेश देवराव |
| कंठेवाड सविता मारोतराव | चव्हाण आनंद शंकरराव |
| अंजुम बेगम शेख अफरोज | आनेवार गंगासागर संदीप |
| कल्याणकर बालाजी देविदासराव | भवरे किशोर दामोधर |
| प्रमोद मुरलीधराव खेडकर | कनकदंडे मोहिनी महेशराव |
| स.जानी म.कासीम | मोकले सोनाबाई रामचंद्र |
| पोकर्णा नवलकुमार ओमप्रकाश | जाधव जयश्री आनंद |
| गुर्रम विनयकुमार जगदिश | गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ |
| उमरेकर अशोक रावण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| रजियाबेगम अयुबखान | सलिमा बेगम नुरुल्लाखान |
| गाडगे शंकर जयवंतराव | देशमूख वैशाली मिलिंद |
| गायकवाड अंजली सुरेशराव | देशमूख बालासाहेब गंगाधराव |
| स.इतरत फातेम स.मजहुर हुसेन | गफारखान गुलाम महमंद खान |
| धबाळे गणपतराव भिवाजी | अनुजा अमितसिंह तेहरा |
| शर्मा पुष्पाताई राजेश | नवाब गुरुमितसिंघ ब-यामसिंघ |
| राओत्रे संगिता पृथ्वीराज | गिल सरजितसिंध पंजाबसिंघ |
| अ.हबीब अ.रहिम बागवान | बिपाशा बेगम स.वलिवोध्दीन |
| अ.सत्तार अ.गफुर | आसीयाबेगम अ.हबीब बागवान |
| स.शेर अली स.महेबुब अली | इतरत फातेमा अ.शमीम |
| तेहसीन बेगम अ.समद | राखेवार सतिष शेषप्पा |
| अ.लतिफ अ.मजीद | जकिया बेगम स.मुखतार |
| गुरुखुर्दे सुंदरलाल किशनलाल | बावजीर शेख हबीब शेख अब्दुल |
| रावत दिपकसिंह काशिनाथसिंह | किशोर यादव |
| गायकवाड वैजयंती भिमराव | मोरे संजय गंगाधरराव |
| काकडे सिंधू पांडूरंग | देशमुख मंगला गजानन |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | सौ.ललिता मुंकुंदराव बोकारे |
| विनय विश्वांभरराव पाटील | जमदाडे करुणा भिमराव |
| घोगरे इंदूबाई शिवाजीराव | येवनकर विजय हिराचंद |
| अड.बन शाम वामनराव | अल केसरी हसन बिन उमेद |
| काबरा रामनारायण रामदेव | |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.शैलजा किशोर स्वामी अ,महापौर हे होते तसेच श्री सुशील खोडवेकर आयुक्त,श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, प्रशासन,श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक,डॉ.आसिफ , मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री विजय मुंढे, प्र.उपायुक्त .आयुक्त, आरोग्य, श्री गिरीष कदम, अभियता. श्री अंधारे, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

सुरवातील नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामूहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर.** स्थायी समितीची सभापती सौ.अनुजा अमितसिंह तेहरा, आयुक्त, सर्व स.सदस्य, अधिकारी कर्मचा-याचे स्वागत करुन आजच्या अंदाजपत्रकीय विशेष सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**अ.सत्तार** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे पशु वैद्यकिय अधिकारी श्री रईसोध्दीन याचे वडील अहेमोध्दीन यांचे नुकतेच –हदय विकाराने दुःखद निधन झाले असल्यामूळे त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**गफार खान** या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे तसेच महाराष्ट राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ,राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते आर.आर.पाटील (आबा) यांचेही दुःखद निधन झाल्यामूळे त्यांना तसेच खुदवईनगर भागातील घरास आग लागून घरातील नवरा बायको व त्यांची दोन मुले जळुन मृत पावली त्यानाही भावपुर्ण श्रदांजली अर्पण करण्यात यावी.

**सरजितसिंघ गिल** महाराष्ट राज्याचे माजी गृहमंत्री आर.आर.पाटील यांचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांना भावपुर्ण श्रदांजली अर्पण करण्यात यावी.

**महापौर** सामाजिक कार्यकर्ते अहेमोध्दीन ,माजी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील , व खुदवईनगर येथील घरास आग लागून त्या मृतपावलेल्या व्यक्तीना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

**ठराव क्र. १६८** **ठराव**

नांवामनपाकेतील पशु वैद्यकिय अधिकारी श्री रईसोद्दीन यांचे वडील अहेमदोद्दीन यांचे नुकतेच –हृदय विकाराच्या तिवृ झटक्याने दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र. १६९** **ठराव**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व राष्टवादी पक्षाचे जेष्ठ नेते आर.आर.पाटील, (आबा) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झालेले असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण् सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**ठराव क्र. १७०** **ठराव**

नांवामनपा हध्दीतील प्रभाग क्र.२६ खुदवईनगर येथील नागरीकाचे घरास आग लागून या आगीमध्ये त्यांचे तसेच त्यांची पत्नी, व लहान दोन मुलांचा मृत्यू झाला असल्यामूळे त्यांना ही नांवामनपाकेची सर्वसाधारण सभा भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. तसेच त्यांच्या कुंटुंबावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**विषय क्र. १ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले व स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार केलेल्या शिफारशी नुसार सालसन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन २०१६-२०१७ चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत.

**मा. सभापती स्थायी समिती यांनी सालसनचे २०१५-१६ चे सुधारीत व सालसन २०१६-१७ चे मुळ अंदाजपत्रक मा. महापौर यांना सादर केले आहेत व आपला मनोगत वाचुन दाखविले आहे.**

**विरेंद्रसिंघ गाडीवाले** अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा सभा तहकुब करण्यात यावा.

**अ. सत्तार अ. गफुर** श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे व सर्व सभागृहाचे अनुमोदन आहे

**महापौर** अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात येते सदरची सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येते सभेची तारीख नंतर लेखी कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| नावाशमनपा नांदेड | नावाशमनपा नांदेड |